# वसाहतकालीन महिला विषयक कायद्यांचा ऐतिहासिक अभ्यास

**कु. सृष्टी हळूरे**
बी. ए. भाग 2 - इतिहास
विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर

**घोषवारा -**

१९ व्या शतकात ब्रिटिश राज्य प्रस्थापीत होऊन भारत पारतंत्र्याच्या जोखडात अडकला होता. याचवेळी व्यक्तिस्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, बुद्धिवाद, लोकशाही, उदारमतवाद इत्यादी युरोपमधील वैचारिक नावविचारांचे प्रवाह इंग्रजी भाषेतून भारताकडे वाहू लागले. याचकाळात ब्रिटनमध्ये स्त्री-स्वातंत्र्याची चळवळ उदय पावत होती. इंग्रजी भाषेचा अभ्यास केलेली मध्यमवर्गीय पिढी भारतात निर्माण झाल्याने त्यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींना चालना मिळाली. समाजाकडे, व्यक्तीकडे पाहण्याची नवी दृष्टी यामुळे मिळाली. यातूनच धर्म, चालीरीती, परंपरा या नावाखाली होणारा अन्याय याचे भयंकर दृश्य त्यांच्या समोर उभे राहिले त्यामुळे त्यांची मने अस्वस्थ झाली.

भारतात ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर स्त्री जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला गेला. स्त्रियांच्या शिक्षणावर व त्यांच्यावर ज्या रूढी,परंपरा लादल्या होत्या त्यात ब्रिटिश हस्तक्षेप करू शकत नव्हते. पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, महात्मा फुले यांनी स्त्रियांचे प्रश्न मांडले यांच्या प्रयत्नामुळे स्त्रियांकडे पाहण्याची समाजाची दृष्टी मोठ्या प्रमाणात बदलली गेली. ब्रिटिशांच्या सुधारणांमुळे भारतीय स्त्री जीवनावर अनेक योग्य परिणाम झाले. प्रस्तुत शोध निबंधातुन ब्रिटीशकालीन महिला विषयक कायद्यांवर चर्चा केली जाणार आहे.

**कळीचे शब्द -** व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, उदारमतवाद, मध्यमवर्गीय पिढी, चालीरीती, परंपरा...

**प्रस्तावना:**

स.न. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यानंतर ब्रिटिश संसदेने भारतासाठी कायदे पध्दतीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये व्यक्तीगत स्वातंत्र्याचा समावेश करण्यात आला. त्याचवेळी भारतीय समाजसुधारकानीं स्त्री सुधारणेची मोहीम सुरू केली. त्यातूनच ब्रिटिश राज्यकर्त्यांनी स्त्री विषयक विभिन्न कायदे केले. वसाहतकालीन स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी १९ व्या व २० व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळी कारणीभूत होत्या.

विवाहविषय, संपतीविषयक कायद्यांनी स्त्रीला वैयक्तिक व सामाजिक स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. १९ व्या शतकाच्या आरंभीला "गोठ्यातील दावणीला बांधलेले मुके जनावर" अश्या अवस्थेत असलेली स्त्री २०व्या शतकात स्वतःच्या पायावर उभी राहून बोलण्यास समर्थ झाली.

वसाहतकालीन महिलांविषयक कायदे -

**१. देवदासी प्रतिबंधक कायदा (१८९१) -**

देवदासी ही वाईट प्रथा वेश्याव्यवसायाला प्रोत्साहन देणारी प्रथा होती. ही प्रथा नष्ट करण्यासाठी तत्कालीन भारतातील काही संस्थानिकांनी पावले उचलली. म्हैसुर संस्थानने १९१० मध्ये ही प्रथा बंद करण्यासाठी कायदा केला. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी १९१० साली ही प्रथा रोखण्यासाठी कोल्हापूर संस्थानात कायदा केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी १६ जून १९३६ मध्ये मुंबईत देवदासींची सभा घेऊन त्यांचे प्रबोधन केले होते. त्यांनी म्हंटले की, "धर्माच्या नावाखाली अनैतिक रीतीने विवाह करणाऱ्या, स्वाभिमान लुप्त झालेल्या व देहविक्री करून पोट भरणाऱ्या स्त्रियांनी जगात काय चालले आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा दाखवावी. ही प्रथा बंद करण्यासाठी महात्मा फुले, वि. रा. शिंदे, छाया दातार इत्यादीनी सुधारकांनी प्रयत्न केले. देवदासी प्रथा नष्ट करण्यासाठी खालील संघटनांनी प्रयत्न केले.

- Joint Women's Organisation
- Indian Health Organisation
- Karnataka Dalit Action Committee
- 'विमोचना'( पुणे)

शेवटी जनता पक्षाच्या राजवटीमध्ये हा कायदा मंजूर झाला व तो १९८१ पासून अमलात आला. १९७५ ते ९२ या काळात प्रबोधन, प्रचार व कायद्याने बंदी होऊन ही प्रथा संपली आहे.

**२. संमती वयाचा कायदा (१८९१) -**

संमती वय म्हणजे स्वतःच्या पत्नीशी शारीरिक संबंध ठेवण्याचे वय. काही मुलींना १२ वर्षाच्या आताच ऋतुप्राप्त होई तेंव्हा गर्भाधान विधी उरकून तिला शरीरसंबंधास योग्य झाली असे समजणे चुकीचे आहे असे आगरकर सांगत होते. ब्रिटिश सरकारने संमती वयाचा कायदा पास करावा म्हणून भारतीय महिलांनी सरकारकडे आग्रह धरला. १८९० मध्ये मुंबईच्या २००० महिलांनी संमती वयोमानाच्या वाढीला पाठींबा देणारा अर्ज सह्या करून सरकारकडे पाठविला होता. १८९० च्या सामाजिक परिषदेस सौ. काशीबाई कानिटकर, पंडित रमाबाई, श्रीमती गंगोली वैगेरे स्त्रिया उपस्थित होत्या. तेथे पास झालेल्या ठरावात म्हंटले होते की १२ वर्षाच्या आत पत्नीशी संबंध करणाऱ्या पतीवर जबरी गुन्हा दाखल करावा. संमती वयाचा कायदा पास करावा म्हणून पुण्यातील ३०० स्त्रियांनी सह्यानिशी अर्ज ब्रिटिश सरकारकडे पाठवीला. संमती वयाचे बिल जेंव्हा सर्वोच्च कायदे मंडळात मांडले त्यावेळी ११ युरोपियन,२ मुस्लिम, व २ हिंदू सदस्य उपस्थित होते. त्यापैकी फक्त रोमेश्चंद्र मित्र यांनी या बिलास विरोध केला .

**३. पटेल बिल (१९२१) -**

आंतरजातीय विवाह शास्त्रसंमत नसल्याने ते बेकायदेशीर ठरत व त्यामुळे हिंदू स्त्रियांवर अन्याय होई. तो दूर करण्यासाठी विठ्ठलभाई पटेल यांनी मध्यवर्ती कायदे मंडळात ५ सप्टेंबर १९१९ रोजी बिल मांडले. हे बिल पटेल बिल या नावाने ओळखले जाते. अच्युत कोल्हटकर लिहितात,"नाटकाची हँडबिले वाटली गेली, भिंतींवर जाहिराती लागल्या....... आता नाटक लागणार इतक्यात काही विशिष्ट कारणे घडली आणि नाटक बंद करावे लागले. नाट्यसंस्थेत पैशाचा चट्टा बसला आणि जवळकरांची पहिलीच कृती वादळात सापडली. सनातनी ब्राम्हणांच्या मागणीनुसार नाटकाचा प्रयोग होण्याआधीच सरकारने त्यावर बंदी हुकूम बजावला."नाशिक येथे २९ डिसेंबर १९१८ रोजी भास्करराव जाधवांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या दुसऱ्या मराठा राजकीय परिषदेत पटेल बिलास संमती देणार ठराव पास करण्यात आला. अष्टे( जि. सातारा) येथे मागासवर्गीय समाजाची ही सभा भरली तेंव्हा पटेल बिल पास करावे अशी शिफारस करणारा ठराव भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सभेत पास झाला. एकंदरीत पटेल बिलामुळे ब्राम्हणेतर चळवळ गतिमान होण्यास मदत झाली.

**४. शारदा बिल (१९२९) -**

सत्यशोधक चळवळीचे नेते महात्मा फुले यांनी बालविवाहावर टीका केली.आपल्या मुलामुलींची लग्ने लहानपणी करू नये म्हणून कायद्याची आवश्यकता मांडली व बालविवाहाचे तोटे सांगितले.२० व्या शतकाच्या दशकात संमतीचे वय १२ ऐवजी १४ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. ही मागणी लक्षात घेऊन २५ जून १९२८ रोजी या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक समिति नियुक्त केली.२० जून १९२९ रोजी या कमिटीने अहवाल सादर केला. कमिटीने मुलीच्या लग्नाचे वय १४ असावे अशी सूचना केली.२८ सप्टेंबर१९२९ रोजी कौन्सिल ऑफ स्टेटने मध्यवर्ती कायदे मंडळात शारदा बिल बहुमताने पास झाले.व्हाइसरॉय च्या संमतीनंतर बालविवाह प्रतिबंधक कायदा १ एप्रिल १९३० पासून अस्तित्वात आला. शारदा बिलाची माहिती ब्राम्हणेतर पक्षनेते बाबासाहेब बोले यांनी नवयुगमध्ये छापली. नवऱ्या मुलाचे वय १८ व मुलीचे वय १४ असावे असे या कायद्यातील अटींचे पालन करण्याची विनंती केली. नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांनी आपल्या शारदा या लोकप्रिय नाटकात बालविवाहाचा प्रश्न मांडला म्हणून हा कोड शारदा कायदा या नावाने ओळखला जातो.

**५. हिंदू विवाह कायदा (१९५५)**

हिंदू कोड बिलाचे चार भाग करून चारही कायदे १९५५-५६ मध्ये पं. नेहरूंनी पास करून घेतले. या कायद्यामुळे जुन्या कायद्यात एकसूत्रीपणा झाला. या ४ कायद्यामुळे स्त्री जीवनात मोठी क्रांती घडुन आली."विवाह म्हणजे संस्कार होय" ही सनातन कल्पना या कायद्याने झुगारून दिली व विवाह हा एक "सामाजिक करार" आहे ही कल्पना स्वीकारली गेली.

या कायद्यातील तरतुदी खालीलप्रमाणे -

१) हिंदू पुरुषाला प्रथम पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न करता येणार नाही. तो गुन्हा आहे व त्या गुन्ह्यास तुरुंगवासाची शिक्षा आहे.

२) एखाद्याने अज्ञात मुलीशी तिच्या इच्छेनुसार परंतु पालकांच्या संमतीशिवाय विवाह केला तर त्यास दंड होऊ शकतो.

३) विवाहप्रसंगी कोणी वेडे आढळल्यास तसा अर्ज फसवणूक झालेल्या पक्षाला कोर्टकडे करता येते व लग्न रद्द करून घेता येते.

४) काही विशिष्ट नातेवाईकांशी लग्न करण्यासाठी हिंदू विवाह कायदा मज्जाव करतो.

५) वधूवरांची वयोमर्यादा - वराचे २१ व वधूचे १८ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

६) या कायद्यानुसार विवाहासाठी खास असा कोणताच विधी नाही. कोणत्याही प्रचलित चालीरितीप्रमाणे विवाह करण्यास मोकळीक आहे.

७) हिंदू कायद्याप्रमाणे सामाजिक पद्धतीनुसार झालेले लग्न नोंदणीबुकात नोंदवण्याची गरज आहे. त्यामुळे विवाह झाल्याचा पुरावा म्हणून ती नोंदणी उपयुक्त ठरू शकते.

८) हिंदू विवाहात विभक्त होणे घटस्फोट अश्या दोन तरतुदी केल्या आहेत. घटस्फोटाच्या अर्जाचा विचार करताना पुढील एखादे कारण सिद्ध व्हावे लागते.

१ - व्यभिचारी वर्तन

२ - क्रूर वागणूक

३ - त्याग करणे

४ - वेड लागणे

५ - महारोग

६ - गुप्तरोग

७ - धर्मांतर

८ - संन्यास

९ - नाहीसे होणे

निष्कर्ष -

वरील माहिती वरून असे दिसून येते की वसाहतकाळात व स्वातंत्र्योत्तर काळामध्ये महिलांवर मोठ्या प्रमाणात रूढी, परंपरांच्या नावाखाली अन्याय होत होते. या अन्याला वाचा फोडण्यासाठी म्हणून काही समाजसुधारकांनी खूप प्रयत्न केले. आणि ते यशस्वी सुद्धा झाले. या मध्ये मोठ्या प्रमाणात महिलांचा समावेश सुद्धा आढळतो. स्त्रियांच्या संरक्षणासाठी ब्रिटिश सरकारने

देखील त्या काळामध्ये कायद्यांच्या निर्मिती करून त्यास मदत केल्याचे दिसून येते. वसाहतकालीन स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेल्या या कायद्यामुळे स्त्री सबलीकरण होऊ शकले व स्त्रियांचा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मोठा सहभाग प्राप्त होऊ शकला.

**संदर्भ -**

१) भारतीय स्त्रीयांचा इतिहास व स्त्री जीवन - डॉ. एस. एस. गाठाळ

२) भारतीय इतिहासातील स्त्रिया स्त्रियांचा रुढीगत आणि वैधानिक दर्जा - डॉ. पदमजा पाटील

३) नंदकुमार भारंबे (2012), *मानवी हक्क,* निराली प्रकाशन, पुणे.

४) नीलम गोऱ्हे ( संपा) - नव्या शतकातील महिला धोरणे व अंमलबजावणी.

५) खिवसरा सारा मंगला (२००५), स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा संदर्भ, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.